PARLE MAHOTSAV
Organiser - ADV. PARAG ALAVANI, President, Vile Parle Cultural Centre
2, Amber Palace, Chittaranjan Road, Vile Parle (East), Mumbai 400 057.
Tel.: 26136513, 26177125 • Website : www.parlemahotsav.com

दि. २५.१०.२०१६

**कृपया प्रसिद्धीकरिता**

# १७ वा पार्ले महोत्सव दिवाळी सुट्टीत आयोजित होणार

मुंबई : मुंबईत सातत्याने आयोजित होणारा पार्ले महोत्सवाचे यंदा १७ वे वर्ष असून एरवी नाताळच्या सुट्टीत होणारा महोत्सव यावर्षी दिवाळीच्या सुट्टीत दि. १९ नोव्हेंबर २०१६ पासून आयोजित होत आहे. त्यामुळे स्पर्धकांनी वेळीच तयारी सुरु करावी व नेहमी प्रमाणे महोत्सवाला उस्फूर्त प्रतिसाद द्यावा असे आवाहन पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

एरवी महोत्सवाचे स्वरुप हे लोकप्रिय सेलेब्रिटीस्चे कार्यक्रम व त्यात तिकीटे विकत घेऊन सामान्य माणूस प्रेक्षक म्हणून जात असतो. मात्र पार्ले महोत्सवाच्या माध्यमातून सामान्य माणसाला त्याच्यातील कलागुणांना सादर करायची संधी मिळते. त्यामुळे सर्वसामान्यामधील कला - गुणांच्या आविष्काराचं एक व्यासपीठ असा पार्ले महोत्सवाचा लौकिक झाला आहे.

१७ वा पार्ले महोत्सव १९ नोव्हेंबर ते ३० नोव्हेंबर २०१६ या कालावधीमध्ये संपन्न होणार आहे. कला, इनडोअर गेम, मैदानी खेळ व सांस्कृतिक अशा चार विभागांमध्ये २२ प्रकारच्या स्पर्धा घेण्यात येणार आहेत. यामध्ये कला विभागाच्या चित्रकला, मेहंदी, हस्ताक्षर स्पर्धा होतील. सांस्कृतिक विभागात नृत्य, समुह नृत्य, पथनाट्य व लघु चित्रपट स्पर्धा होतील. इन डोअर्स गेम मध्ये बुद्धीबळ तर मैदानी खेळात गोळाफेक, ५० मिटर धावणे, शरिरसौष्ठव, स्लो सायकलिंग, वॉलीबॉल, क्रिकेट, मल्लखांब, रस्सीखेच, कबड्डी अशा स्पर्धा होतील याच सोबत टेलीमॅचेस, महिलांसाठी होम मिनिस्टर, लहान मुलांसाठी हेल्दी बेबी, तर जेष्ठ नागरीकांसाठी वन मिनीटस् गेम अशा वैशिष्ट्यपूर्ण स्पर्धा घेण्यात येणार आहेत.

यंदा होणाऱ्या १७ व्या पार्ले महोत्सवात नाट्य - सिने क्षेत्रातील अनेक कलावंत, राष्ट्रीय खेळाडू तसेच विविध क्षेत्रातील मान्यवर महोत्सवामध्ये हजेरी लावणार आहेत अशी माहिती पार्ले महोत्सवाचे प्रमुख आयोजक आमदार ॲड. पराग अळवणी यांनी दिली.

इच्छूक स्पर्धकांनी अधीक माहितीसाठी www.parlemahotsav.com संकेतस्थळावर किंवा पार्ले महोत्सव, २, अंबर पॅलेस, चित्तरंजन रोड, विलेपार्ले पूर्व मुंबई ४०००५७ फोन : २६१७७१२५ / २६१३६५१३ येथे संपर्क साधावा असे आवाहन पार्ले महोत्सव आयोजन समितीकडून करण्यात आले आहे.

---

सदर पत्रक श्री. चरणजीतसिंग संधू, सहआयोजक, पार्ले महोत्सव, यांनी प्रसिद्ध केले आहे.